# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**स्थायी समिती विशेष सभा.**
**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर स्थायी समिती (सभापती निवडीची)**
**सभा क्रमांक ६ दिनांक ०२/०८/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त.**

**--*--**

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांचे स्थायी समिती सभापती निवडीच्या विशेष सभेसाठी स्वागत करणेत आले. (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (स्थायी समिती परिवहन समिती प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक घेणे ) (सुधारणा) नियम २००८ अन्वये मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांना असलेल्या अधिकारानुसार मा.डॉ.श्री.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पिठासीन अधिकारी म्हणुन पत्र क्रमांक नपा/१/२/जा.क्र./८८६१८/१२ दिनांक २५/०७/२०१२ अन्वये प्राधिकृत केले होते. अहमदनगर महानगरपालिकेची आज गुरुवार दिनांक ०२/०८/२०१२ सकाळी ११.०० वाजता मा.स्थायी समिती सभापती निवडीची सभा मा.डॉ.श्री.संजीवकुमार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यांत आलेल्या सभेचे इतिवृत्त.

सभेस पुढील स्थायी समिती सदस्य हजर होते.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाऊ |
| २ | मा.श्री. जगताप नितीन विलास |
| ३ | मा.सौ.गायकवाड निलीमा वसंतराव |
| ४ | मा.सौ.लोंढे मोहिनी संजय |
| ५ | मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू |

| | |
|---|---|
| ६ | मा.सौ.खरमाळे संगीता रत्नाकर |
| ७ | मा.श्री.कवडे उमेश खंडेराव |
| ८ | मा.सौ.गंधे सुमनताई मोहनीराज |

असे एकुण ८ सदस्य सभागृहात हजर होते. येणेप्रमाणे स्थायी समिती सदस्य हजर असुन त्यांनी उपस्थिती बुकात स्वाक्षरी केली आहे. तसेच पुढील प्रमाणे सदस्य अनुपस्थित आहेत.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.डागवाले किशोर आसाराम |
| २ | मा.श्री.कोतकर सुनिलकुमार सर्जेराव |
| ३ | मा.श्री.खान समद वहाब |
| ४ | मा.सौ.उडाणशिवे गिरजाबाई भाऊसाहेब |
| ५ | मा.सौ.कराळे आशा शिवाजीराव |
| ६ | मा.श्री.शेख अरीफ शेख रफिउद्दीन |
| ७ | मा.श्री.बोरुडे अनिल वसंतराव |
| ८ | मा.श्री.भोसले गणेश पुंडलिक |

त्याचप्रमाणे खालील अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १ | मा.डॉ.श्री.संजीवकुमार, जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी, अहमदनगर. |
| २ | मा.श्री.विजय कुलकर्णी, आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर. |
| ३ | श्री.ए.पी.दुर्गे, प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर. |

**मा.जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी :-**

मा.स्थायी समिती सभापती या पदासाठी नगरसचिवांना प्राप्त झालेल्या एका उमेदवाराच्या दोन नामनिर्देशन पत्रांची सकाळी ११.०५ वाजता छाननी सुरुकेली.

त्यात पहिले नामनिर्देशनपत्र श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू यांचे असुन त्यांचे सूचक सौ.गंधे सुमन मोहनीराज व अनुमोदक श्री.बोरुडे अनिल वसंत आहेत. त्यांच्या नामनिर्देशनपत्रावर स्वाक्ष-या आहेत दोन्हीही मा.स्थायी समितीचे सदस्य आहेत. व उमेदवारांनी मुदतीमध्ये आपले नामनिर्देशनपत्र प्रभारी नगरसचिव यांचेकडे दाखल केलेले आहे. त्यामुळे हे नामनिर्देशनपत्र वैध ठरविण्यात येत आहे.

दुसरे नामनिर्देशन पत्र श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू यांचेच असुन त्यांचे सूचक सौ.गायकवाड निलीमा वसंत व अनुमोदक सौ.खरमाळे संगिता रत्नाकर आहेत. त्यांच्या नामनिर्देशनपत्रावर स्वाक्ष-या आहेत दोन्हीही मा.स्थायी समितीचे सदस्य आहेत. व उमेदवारांनी मुदतीमध्ये आपले नामनिर्देशनपत्र प्रभारी नगरसचिव यांचेकडे दाखल केलेले आहे. त्यामुळे हे नामनिर्देशनपत्र वैध ठरविण्यात येत आहे.

याप्रमाणे वरील दोनही नामनिर्देशनपत्र वैध आहेत. मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकी साठी एक उमेदवार आहे त्याचे नांव खालील प्रमाणे.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू |

**मा.पिठासीन अधिकारी :-**

**माघारीची सुचना**

स्थायी समिती सभापती पदाचा उमेदवारी अर्ज माघारीसाठी १५ मिनीटांचा वेळ देण्यांत येत आहे.

विहित मुदतीत उमेदवाराने माघारीचा अर्ज पिठासीन अधिकारी यांचेकडेस सादर केला नाही.

**निकाल**

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभापती निवडणुकीसाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहे. मी संजीव कुमार जिल्हाधिकारी अहमदनगर तथा पिठासीन अधिकारी जाहीर करतो की, **मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू** हे अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे सभापती म्हणुन वैधरित्या निवडून आले आहेत.

आभार.

अहमदनगर.
दिनांक : ०२/०८/२०१२

सही /-
डॉ.श्री.संजीव कुमार,
पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी,
अहमदनगर.